# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः 13.07.2024** **वारः शनिवार**

1. विधान परिषदेच्या निवडणुकीत महायुतीचे सर्व 9 उमेदवार विजयी तर महाविकास आघाडीच्या दोन उमेदवारांचा विजय
2. विधीमंडळाचं पावसाळी अधिवेशन संस्थगित
3. अंतिम आठवडा प्रस्तावावरील चर्चेत सरकारकडून कामकाजाची माहिती, तर विरोधकांकडून सरकारवर टीका
4. पंतप्रधान नरेंद्र मोदी आज मुंबई दौऱ्यावर; विविध पायाभूत सुविधा प्रकल्पांचं करणार उद्घाटन आणि
5. एसटी महामंडळातर्फे येत्या सोमवारपासून प्रत्येक आगारात प्रवासी राजा दिन आणि कामगार पालक दिन

**विधानपरिषद निवडणूक**

विधानपरिषदेच्या 11 जागांसाठी काल झालेल्या निवडणुकीत महायुतीचे सर्व 9 उमेदवार निवडून आले आहेत. तर महाविकास आघाडीचे 3 पैकी 2 उमेदवार निवडून आले. विधान परिषदेच्या 11 जागांसाठी 12 उमेदवार रिंगणात होते. त्यासाठी विधान सभेच्या सर्व 274 आमदारांनी मतदान केलं. भाजपकडून पंकजा मुंडे, परिणय फुके, सदाभाऊ खोत, योगेश टिळेकर आणि अमित गोरखे विजयी झाले. राष्ट्रवादी काँग्रेसचे राजेश विटेकर आणि शिवाजीराव गर्जे तसंच शिवसेनेचे कृपाल तुमाणे आणि भावना गवळी यांनी विजय मिळवला. महाविकास आघाडीतले काँग्रेसच्या प्रज्ञा सातव आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे मिलिंद नार्वेकर निवडून आले.

**विधीमंडळ**

राज्य सरकारनं लोककल्याणासाठी विविध लोकोपयोगी निर्णय घेतले. त्यासाठी कर्ज घ्यावी लागली असं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काल विधानसभेत सांगितलं. अंतिम आठवडा प्रस्तावावर ते उत्तर देत होते. मराठा आरक्षणावर विरोधकांची भूमिका दुटप्पी असल्याचा आरोप त्यांनी केला. अंमली पदार्थ, बेकायदा हॉटेल बंद होत नाहीत तोपर्यंत त्यांच्यावरची कारवाई सुरू राहील असं मुख्यमंत्री म्हणाले.

दोन वर्षात राज्यातल्या महायुती सरकारनं रखडलेले प्रकल्प मार्गी लावत सर्वच क्षेत्रात लक्षणीय कामगिरी केली आहे, असं उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानपरिषदेत सांगितलं. अंतिम आठवडा प्रस्तावासह इतर प्रस्तावांवरील चर्चेला ते उत्तर देत होते. मराठवाडा आणि विदर्भातला सिंचनाचा अनुशेष मोठ्या प्रमाणात दूर करण्याचा प्रयत्न राज्य सरकारनं केला आहे, असं ते म्हणाले. राज्यात गंभीर गुन्ह्यांमध्ये तीन टक्क्यांपेक्षा अधिक घट झाली आहे. महिलांसंदर्भातील गुन्हे पोलीस अतिशय संवेदनशीलतेनं हाताळत असून महिला अत्याचाराच्या गुन्ह्यांमध्ये घट झाली आहे असं फडणवीस म्हणाले.

दरम्यान, विधानसभेतले विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी अंतिम आठवडा प्रस्तावावरील चर्चेदरम्यान सरकारवर कडाडून टीका केली. महागाई, बेरोजगारी, घोटाळे यामुळे महायुती सरकारच्या काळात राज्याची अधोगती झाल्याचा आरोप त्यांनी केला. फसव्या घोषणांसाठी सरकारनं राज्याला कर्जबाजारी केलं; विरोधी पक्षांना जनतेला विश्वासात घेतलं नाही असं म्हणत दाओसचा करार हा एक जुमलाच असून सरकारनं दाओसची श्वेतपत्रिका काढली पाहिजे असं वडेट्टीवार म्हणाले.

राज्य विधिमंडळाचं पावसाळी अधिवेशन काल संस्थगित झालं. तत्पूर्वी विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी या अधिवेशनातल्या कामकाजाचे तपशील सभागृहात सादर केले आणि त्यानंतर राज्यपाल रमेश बैस यांचा संदेश सभागृहाला वाचून दाखवला.

**दानवे पत्रकार परिषद**

राज्य विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाच्या काळात सामान्य जनता, शेतकरी, महिला, बेरोजगार यांच्या विविध मुद्द्यांवर विरोधकांनी सत्ताधाऱ्यांना कोंडीत पकडलं, असं विधानपरिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी कामकाज संस्थगित झाल्यानंतर

वार्ताहर परिषदेत सांगितलं. राज्य आर्थिकदृष्ट्या डबघाईला आलेलं असताना सरकारने अनेक नव्या योजना जाहीर केल्या, पण त्यासाठीचा निधी कुठून येणार, याचं समाधानकारक स्पष्टीकरण सरकारला देता आलं नाही असं दानवे म्हणाले. विधानपरिषदेच्या सभापतीपदाची निवडणूक सरकारनं घ्यायला हवी, या मागणीचा पुनरुच्चार त्यांनी यावेळी केला.

**<u>पंतप्रधान</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज मुंबईच्या दौऱ्यावर येणार असून त्यांच्या हस्ते 52 हजार 300 कोटी रुपयांपेक्षा अधिक खर्चाच्या विविध प्रकल्पांचं भूमिपूजन आणि लोकार्पण होणार आहे. गोरेगाव इथल्या नेस्को प्रदर्शन केंद्रात रस्ते, रेल्वे आणि बंदर क्षेत्राशी 29 हजार 400 कोटी रुपये खर्चाच्या प्रकल्पांचं लोकार्पण आणि पायाभरणी मोदी यांच्या हस्ते होईल. गोरेगाव- मुलुंड रस्त्यावरचा जुळा बोगदा, ठाणे बोरिवली दरम्यानचा बोगदा तसंच, नवी मुंबईत तुर्भे इथं कल्याण यार्ड रिमॉडेलिंग आणि गती शक्ती मल्टी मॉडेल कार्गो टर्मिनल या प्रकल्पांची पायाभरणी पंतप्रधानांच्या हस्ते होईल. त्यानंतर ते लोकमान्य टिळक टर्मिनसवरच्या नवीन फलाटाचं लोकार्पण करतील. मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेचं उद्घाटन देखील मोदी यांच्या हस्ते होणार असून संध्याकाळी ते इंडीयन न्यूजपेपर सोसायटीच्या नव्या इमारतीचं उद्घाटन करणार आहेत.

**<u>संविधान हत्या</u>**

25 जून हा दिवस यापुढे संविधान हत्या दिवस म्हणून पाळण्याचा निर्णय केंद्र सरकारने जाहीर केला आहे. 1975 मध्ये याच दिवशी तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी देशात आणीबाणी जाहीर केली होती, त्याच्या स्मरणार्थ हा दिवस पाळण्यात येणार आहे. भारताचं संविधान पायदळी तुडवलं गेलं तेव्हा काय घडलं होतं, याची आठवण करून देणारा हा दिवस असेल, आणीबाणीमुळे ज्या लोकांना त्रास झाला त्यांच्यासाठी ही आदरांजली ठरेल, असं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी समाजमाध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे.

**<u>उपराष्ट्रपती</u>**

केंद्र सरकार राबवत असलेल्या विविध विधायक उपक्रमांमुळे देशात चांगला, शाश्वत बदल घडून आला असून तो विशेषकरुन युवा पिढीच्या फायद्याचा आहे असं प्रतिपादन उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी केलं आहे. ते काल मुंबईतल्या शैक्षणिक संस्थेत 'भारताचं सबलीकरण-2047 पर्यंत विकसित भारत घडवण्यात उच्च शिक्षण संस्थांची भूमिका' या विषयावरील परिसंवादात बोलत होते. तंत्रज्ञान, डिजिटल रुपांतरण, शाश्वत विकास, उद्योजकता आणि नवोन्मेष यासारख्या विविध क्षेत्रांमध्ये विकसित भारत घडवण्यात उच्च शिक्षण संस्था महत्त्वपूर्ण योगदान देऊ शकतात असं त्यांनी सांगितलं.

**<u>मोहोळ</u>**

पुणे आंतरराष्ट्रीय विमानतळावरचं नवं टर्मिनल उद्यापासून कार्यान्वित होणार आहे. केंद्रीय नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी काल या टर्मिनलची प्रत्यक्ष पाहणी करून आढावा घेतला. पुण्याच्या संस्कृतीची छाप असलेल्या या टर्मिनलविषयी खासदार मोहोळ म्हणाले.....

**<u>संपूर्णता अभियान</u>**

निती आयोगाच्या आकांक्षित जिल्ह्यांसाठीच्या संपूर्णता अभियानाअंतर्गत नंदूरबार जिल्ह्यात खांडदबारा इथं महिला आणि बालविकास विभागातर्फे गरोदर माता आणि बालकांना सकस आहाराबाबत माहिती देण्यात आली. याबाबत माहिती देताना विभागाच्या पर्यवेक्षिका सारिका दादर म्हणाल्या....

**<u>परिवहन महामंडळ</u>**

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या वतीनं येत्या सोमवारपासून प्रत्येक आगारात प्रवासी राजा दिन आणि कामगार पालक दिन साजरा करण्यात येणार आहे. दर सोमवारी आणि शुक्रवारी या उपक्रमाअंतर्गत कामगार आणि प्रवाशांच्या समस्या, तक्रारी आणि सूचनांवर स्थानिक पातळीवर तोडगा काढला जाणार आहे. महामंडळाच्या अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार एस. टी. चे विभाग नियंत्रक सकाळच्या सत्रात प्रवाशांच्या तर दुपारच्या सत्रात कामगारांच्या लेखी तक्रारी स्वीकारणार आहेत. प्रत्येक जिल्ह्यासाठी या उपक्रमाचं वेळापत्रक निश्चित करण्यात आलं आहे.

**<u>पोटनिवडणूक</u>**

राज्यातल्या विविध नगरपंचायती आणि एका नगर परिषदेतल्या मिळून 11 सदस्यांच्या रिक्त जागांसाठी येत्या 11 ऑगस्ट रोजी पोटनिवडणूक होणार आहे. याबरोबरच कोल्हापूर जिल्ह्यातल्या हातकणंगले नगरपंचायतीच्या थेट अध्यक्षपद निवडणूकीसाठीही 11

ऑगस्टला मतदान होणार आहे. मतमोजणी 12 ऑगस्टला होणार असल्याची माहिती राज्य निवडणूक आयोगानं दिली आहे.यासाठी उमेदवारी अर्ज भरण्याची मुदत 18 ते 24 जुलैपर्यंत आहे.

**अपघात-नाशिक**

नाशिक शहराजवळील आडगाव इथं काल झालेल्या अपघातात चार जण ठार झाले तर दोन जण जखमी झाले आहेत. ट्रकचे टायर फुटल्यामुळं ट्रक समोरून येणाऱ्या कार वर आदळली आणि अपघात झाला. जखमीना नाशिकच्या जिल्हा शासकीय रुग्णालयामध्ये दाखल करण्यात आलं आहे.

**हवामान**

येत्या 24 तासांत कोकणात बहुतांश ठिकाणी पाऊस पडेल. किनारपट्टीवर तुरळक ठिकाणी सोसाट्याच्या वाऱ्यांसह खूप जोरदार पाऊस पडण्याचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे. मध्य महाराष्ट्र आणि विदर्भात बऱ्याच ठिकाणी मुसळधार पाऊस पडेल तर मराठवाड्यातही काही ठिकाणी पावसाची शक्यता असल्याचं हवामान विभागानं म्हटलं आहे.

# आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं. नमस्कार.

#